# प्रेस नोट

## मौजमजेसाठी मोबाईल चोरणारा विधीसंघर्षीत बालक पोलीसांच्या ताब्यात त्याचेकडुन तीस  मोबाईल जप्त

हिंजवडी पोलीस स्टेशन गुरनं-२२०/२०१७, भादंविक-३८० मधील फिर्यादी श्री योगेश तुकाराम माळी वय-२५ वर्षे धंदा-नोकरी रा.मारुंजी, ता.मुळशी जि.पुणे हे त्यांचे रुम पार्टनरसह दिनांक १०/०५/२०१७ सकाळी ०६/३० वा. समारास खुप गरमी होत असल्याने घराचा दरवाजा उघडा ठेवुन झोपलेले होते. त्यावेळी कोणीतरी आज्ञात चोरटयाने उघडया दारवाज्यावाटे घरात प्रवेश करुन फिर्यादी व त्याच्या मित्राचा अशी दोन मोबाईन हॅन्डसेट चोरुन नेला होता. दाखल गुन्हयाच्या अनुषगाने हददीमध्ये पेट्रोलींग फिरत असताना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मोबाईलची चोरी करणारा इसम चोरीचे मोबाईल घेवुन संत तुकाराम साखर कारखान्या समोर कासारसाई ता. मुळशी जि. पुणे येथे चोरीचे मोबाईल विक्रीसाठी येणार आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने संत तुकाराम साखर कारखान्यासमोर थांबलो असता सकाळी ०९/३० वा.चे सुमारास एक मुलगा खांदयावर काळया रंगाची सॅक घेवुन येत असताना दिसल्याने त्यास आमचे बरोबर असलेल्या स्टाफच्या मदतीने पकडुन विधीसंघर्षीत बालक त्यास विश्वासात घेवुन त्याचेकडे असलेल्या सॅक/बॅगची पाहणी केली असता त्यामध्ये मोबाईल हॅडसेट असल्याचे आढळुन आले. म्हणुन सदरचे मोबाईल त्याने कोठुन आणले, कोणाचे आहेत याबाबत चौकशी केली असता त्याने सदरचे मोबाईल त्याने मागील १५ ते २० दिवसापासुन माण, हिंजवडी, मारुंजी, कासारसाई भागातुन चोरलेले आहेत. त्यातील काही मोबाईल विकण्याकरीता कासारसाई येथे आलो होतो असे सांगितले. सदर विधीसंघर्षीत बालकास मोबाईलसह स्टाफच्या मदतीने हिंजवडी पोलीस स्टेशन, पुणे येथे आणुन त्याचेकडील मोबाईलची बारकाईने पाहणी केली असता त्याचे सॅकमध्ये एकुण **३,००,०००/- रु.** किंमतीचे एकुण **३०** वेगवेगळया कंपनीचे मोबाईल जप्त करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री.गणेश शिंदे पोलीस उप-आयुक्त सो.परि-३,श्री विक्रम पाटील साहाय्यक पोलीस आयुक्त सो.चंतु:श्रृंगी विभाग,पुणे शहर,श्री अरुण वायकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो.हिजवडी पोलीस ठाणे पुणे,श्री रंगनाथ उंडे सो.पोलीस निरीक्षक (गुन्हे) हिंजवडी पोलीस स्टेशन पुणे,श्री विश्वजीत खुळे सो. पोलीस निरीक्षक (प्रशासन)हिंजवडी पोलीस स्टेशन पुणे यांचे मागदर्शनाखाली गणेश धामणे सहाय्यक पोलीस निरीक्षक, महेश आबनावे पोलीस उप निरीक्षक, पोना १३६८ आनंद खोमणे,पोना ६७५९ आशिष बोटके,पोना ६६७७ सचिन उगले,पोना ६५०२ विजय पाटील,पो ना ६९७५ विवेक गायकवाड,पो कॉ ६९९० आतिक शेख ,पो कॉ ७७१६ ज्ञानेश्वर मुळे यांनी केली.